जा. क्र. 45/2018

धर्मादाय आयुक्त कार्यालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई,
दिनांक ०२.०१.२०१८.

02 JAN 2018

## परिपत्रक क्रमांक ५२८/२०१८ दिनांक ०२.०१.२०१८

या परिपत्रकाद्वारे धर्मादाय संघटनेतील अधिका-यांना असे निर्देशित करण्यात येते कीं, आपल्या कार्यालयात प्रलंबित असलेले विना वाद बदल अर्ज निकाली काढणेसाठी धर्मादाय कार्यालयामार्फत झिरो पेंडंसी (zero pendency) हे अभियान घेण्यात येत असून या अभियानाचा कालावधी दिनांक १५ जानेवारी, २०१८ ते १५ फेब्रुवारी, २०१८ असा आहे. या एक महिन्याच्या कालावधीत, आपण आपल्या न्यायालयात प्रलंबित असलेले विना वाद बदल अर्ज निकाली काढावेत. सदरील बदल अर्ज प्रलंबित असल्यामुळे, न्यासाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत असून, कांहीही वाद नसतांना, असे बदल अर्ज प्रलंबित ठेवणे प्रस्तुत नाही. त्यामुळे आपण सदरील एक महिन्याच्या कालावधीत आपल्या न्यार्यालयात प्रलंबित असलेले विना वाद बदल अर्ज निकाली काढावेत व दर आठ दिवसांनी आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपआपल्या धर्मादाय सह आयुक्त यांना कळवावा व धर्मादाय सह आयुक्त यांनी त्यांच्या त्यांच्या विभागाचा अहवाल या अधिकारीणीस पाठवावा.

(शि. ग. डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत--

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त

D:\mbsarnobat\Administrative orders-circulars\January, 2018.docx